RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक १६] गुरुवार, मार्च ३, २०२२/फाल्गुन १२, शके १९४३ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक ३२

## प्राधिकृत प्रकाशन

### चिपळूण नगरपरिषद, चिपळूण

### अधिसूचना

क्रमांक नगररचना विभाग/३३५२/२०२१-२०२२

**महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये.**

ज्याअर्थी, चिपळूण शहराची प्रथम विकास योजना दिनांक १ मार्च १९८९ रोजी अंमलात आली असून चिपळूण शहराची सुधारित विकास योजना (भागश: मंजूर) २०१८ टीपीएस. १७१७/५५१/प्र.क्र. १५५/१८/नवि-१२, दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ अन्वये मंजूर आहे.

चिपळूण शहराच्या (भागश: मंजूर) सुधारित विकास योजनेनुसार सि.स.नं. ६०३५/२ पैकी काही जागा आरक्षण क्रमांक ७१ " खेळाचे मैदान " करिता आरक्षित आहे. शासनाच्या मा. कार्यासन अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक टीपीएस. १२२१/२८६/२१/ नवि-१२, दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ रोजीचे पत्रान्वये प्राप्त निदेशानुसार चिपळूण शहरातील सि.स.नं. ६०३५/२, वरील " खेळाचे मैदान " हे आरक्षण वगळूण उर्वरित आरक्षण क्रमांक ७१ मध्ये जाणेस ९.०० मीटरचा पोच मार्ग आरक्षित ठेवून सि.सं.नं. ६०३५/२ वरील बाधित क्षेत्र रहिवास वापरात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगरचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वेय सुधारित चिपळूण शहर विकास (भागश: मंजूर) योजनेत फेरबदल करणेचे ठरविले आहे.

त्याअर्थी, कळविणेत येते की, ज्यांना अशा फेरबदलाबाबत सूचना अगर हरकती द्यावयाच्या असतील त्यांनी ही नोटीस **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीत लेखी स्वरूपात आपल्या सूचना अगर हरकती खालील स्वाक्षरी करणाऱ्यांकडे सादर करावयाच्या आहेत.

वरील फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ नगरपरिषदेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत ठेवण्यात आला आहे.

**श्री. प्रसाद शिंगटे,**
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
चिपळूण नगरपरिषद.

चिपळूण,
दिनांक २८ फेब्रुवारी २०२२.

## CHIPLUN MUNICIPAL COUNCIL, CHIPLUN

*NOTIFICATION*

क्रमांक नगररचना विभाग/३३५२/२०२१-२०२२

UNDER SECTION 37(*1*) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966 .

Whereas Chiplun City Development Plan is being implemented by the Government of Maharashtra From 1st March 1989 and Chiplun City Revised Development Plan (Partly sanctioned) is being implemented as per Notification TPS.1717/551/C.R.155/18/UD-12, dated 3rd November 2018.

Part Area of CTS No. 6035/2 is reserved for " Playground " as Reservation No. 71 in Chiplun City Revised Development Plan (Partly sanctioned) 2018. As directions given by the Government of Maharashtra through letter from Urban Development Department TPS.1221/286/21/UD-12, dated 18th October 2021 Reservation No. 71 - " Playground " is to be Released from affected area of CTS No. 6035/2 by keeping 9.00 M. wide approach road for remaining reservation and land use of the said land is to be classified as residential. It has been decided under section 37(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to make above modification in Chiplun City Revised Development Plan (Partly sanctioned) 2018.

It is therefore, informed that those who want to submit suggestions or objections to such modification should issue a notice in the written form to the signatory within one month from the date of the publication in the *Gazette of Government of Maharashtra.*

A map showing the above modification has been kept in the Municipal Council's Office for Public viewing during working hours.

PRASAD SHINGATE,
Administrator and Chief Officer,
Chiplun Municipal Council,
Chiplun.

Chiplun,
dated 28th February 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHEDAT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD,MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.